# हरित इमारतींसाठी मिरा-भाईंदरचा पुढाकार

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर महापालिकेच्या विपश्यना केंद्राची एक इमारत नुकतीच हरित वास्तू म्हणून घोषित करण्यात आली असून ही शहरातली पहिलीच हरित वास्तू ठरली आहे. आता यापुढे जात, आगामी काळात शहरात अधिकाधिक पर्यावरणस्नेही (हरित) इमारती उभ्या राहाव्यात,

## विकासकांना प्रोत्साहित करण्यासाठी उद्या बैठक

यासाठी पालिकेने पुढाकार घेतला आहे. त्यादृष्टीने विकासकांना प्रोत्साहित करण्यासाठी पालिका मुख्यालयात उद्या, बुधवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत गृहप्रकल्प तसेच इतर प्रकल्प उभारण्यासाठी विकासकामे मोठ्या संख्येत सुरू आहेत. सरकारकडून विकासकांना पर्यावरणस्नेही (हरित) इमारती उभारण्यास प्रोत्साहन म्हणून सवलत दिली जाते. मात्र तरीही त्याकडे पाठ फिरवण्यात आली आहे. पालिकेच्या एका विपश्यना केंद्राला शहरातील पहिलीच 'हरित वास्तू' म्हणून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले, त्यावेळी ही बाब प्रकर्षाने समोर आली.

हरित इमारतींना प्रोत्साहन देण्यामागे प्रदूषण कमी करणे, ऊर्जेची बचत व चांगले वातावरण निर्माण करणे हा सरकारचा मुख्य उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर, आगामी काळात मिरा-भाईंदर शहरात अधिकाधिक संख्येने पर्यावरणस्नेही इमारती उभारण्यात याव्यात, यासाठी आता महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. यासाठी उद्या, बुधवारी, दुपारी ३ वाजता पालिका मुख्यालयात विकासकांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला शहरातील सर्व विकासकांनी हजर राहावे, अशा सूचना पालिकेच्या नगररचना विभागाने दिल्या आहेत.



### तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

या बैठकीत हरित इमारत म्हणजे नक्की काय? ही संकल्पना राबवल्यास पर्यावरणाची हानी कशी कमी होईल? सरकारकडून कोणत्या सवलतींचा लाभ मिळेल, ग्राहकांना कोणते लाभ मिळतील, या संदर्भात भारतीय हरित इमारत परिषद (आईजीबीसी) व पालिका अधिकाऱ्यांमार्फत विकासकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.